## माफसु

# यशोगाथा





MAHARASHTRA ANIMAL & FISHERY SCIENCES UNIVERSITY NAGPUR






# मत्स्य विज्ञान महाविद्यालय,उदगीरच्या दत्तक गावामधील मत्स्यसंवर्धनाची यशोगाथा

सन् २०१५-१६ यावर्षी उदगीर तालुक्यातील नावंदी या गावाचा मत्स्यसंवर्धनातून विकास व्हावा, या हेतूने हे गाव तांत्रिक मार्गदर्शनासाठी मत्स्यविज्ञान महाविद्यालय, उदगीरने दत्तक घेतले. श्री. ब्रम्हाजी केंद्रे या नावंदी गावातील प्रगतीशील शेतकऱ्याने फळबागेसाठी पाण्याचा पुरवठा करण्याच्या हेतूने सोय म्हणून ४४ मी. × ४४ मी. या आकाराच्या शेततळयांची निर्मिती केली. हया शेततळयाचा अवलंब मत्स्यपालनासाठी करता यावा म्हणून उपरोक्त महाविद्यालयातील तज्ञ व्यक्तीकडून श्री. केंद्रे यांनी प्राथमिक ज्ञान घेतले. १० जुलै २०१५ रोजी महाविद्यालयाने आयोजित केलेल्या शेतकरी कार्यशाळेत सहभागी होवून अधिक मार्गदर्शन प्राप्त केले. या मार्गदर्शनाचा वापर करून शेततळयामध्ये मत्स्यसंवर्धन करायचेच असा पक्का मनसुबा केला. मत्स्यपालना दरम्यान बीज, जल, खाद्य, विक्री इत्यादिंचे व्यवस्थापन कशा पध्दतीने करायचे याबाबत अनुभव शुन्य असल्यामुळे अनेक प्रश्न केंद्रे यांच्या मनाला बेचैन करीत होते. परंतु मत्स्यविज्ञान महाविद्यालयाचे तत्कालीन अधिष्ठाता डॉ. ए. पी. सोमकुंवर यांच्या पाठींब्यामुळे आत्मविश्वास बळावण्यास मदत झाली. महाविद्यालयामधील सहाय्यक प्राध्यापक श्री. एस. आर. यादव, प्रयोगशाळा सहाय्यक श्री. बी. एस. चौधरी व इतर तज्ञ व्यक्तींच्या वेळोवेळी मार्गदर्शन व प्रोत्साहनामुळे त्यांनी शेतळयांमध्ये मत्स्यपालन सुरू केले.

श्री. केंद्रे यांनी ऑगस्ट महिन्यामध्ये पंगस जातीचे अंदाजीत १५००० अर्धबोटूकली आकारमानाचे मत्स्यबीज शेततळयामध्ये संचयित केले. मत्स्यविज्ञान महाविद्यालयातील प्राध्यापकांनी नियमित भेट देवून जल, खाद्य, व विक्री व्यवस्थापन याबाबत सखोल असे मार्गदर्शन केले. त्यानुसार शास्त्रोक्त पद्धतीने व्यवस्थापन केलेमुळे माश्यांना उत्तम विक्रीसाठी समाधानकारक बाजारभाव मिळाला.

माश्यांना योग्य भाव मिळावा म्हणून मासे एकदाच न पकडता टप्प्या-टप्प्याने पकडले व त्याची विक्री जिवंत अवस्थेत गाव परिसरात केली जाते. मे महिन्यामध्ये माश्यांचे वजन अर्धा ते पाऊन किलो एवढे होते. संवर्धनाअंती एकंदरीत ६ टन एवढे मत्स्योत्पादन मिळाले. संवर्धनासाठी एकूण रूपये ३.५ लाख एवढा खर्च आला. त्यामधून त्यांना रूपये ७.२ लक्ष एकूण उत्पन्न झाले. म्हणजेच निव्वळ नफा रू. ३.७ लक्ष इतका झाला. सोबतच त्यांनी ३२०० शेवगा, १६०० आंबे, ५८० लिंबू आणि २३१ नारळ या झाडांची लागवड केली आहे. मत्स्यसंवर्धनामधुन निचरा केलेल्या पाण्याचा बागायतीसाठी अनुकूल परिणाम होत असल्याचे त्यांचे मत आहे.

नावंदी गावातील पहिलेच यशस्वी शेतकरी म्हणुन केंद्रे ज्यांनी उदगीर परिसरामध्ये शेततळयाचा वापर करून मत्स्यसंवर्धनाच्या माध्यमातून दुष्काळी परिस्थितीवर मात केली. त्याची माहिति इतर शेततळीधारकांना मिळाल्यामुळे चालू वर्षी अनेकांनी शेततळयामध्ये मत्स्यसंवर्धन सुरू केले आहे.

**मार्गदर्शक :**
**श्री. एस.आर. यादव, श्री. यु. ए. सुर्यवंशी**
**सहाय्यक प्राध्यापक,**
**श्री. बी. एस. चौधरी, प्रयोग शाळा सहाय्यक,**
मत्स्यविज्ञान महाविद्यालय, उदगीर

श्री. ब्रम्हाजी केंद्रे
मु.पो. नावंदी ता. उदगीर जि. लातूर